**नियमित दिवाणी मुकदमा क्र. ४२/२०१९**

(शेख कासम अब्दुल करीम विरुध्द शेख इक्बाल अब्दुल करीम व. १७)

## :– नि. ३५ खालील आदेश –:

अर्ज व म्हणणे वाचून पाहिले. वादी यांनी सदरचा अर्ज सदर दाव्यातील प्रतिवादी वादी नं. ०९ फामिता उस्मान शेख हे मयत झाले असून त्यांचेविरुध्द दावा उपशमित झालेला आहे. तरी सदरचा आदेश रद्द होवून प्रतिवादी नं.०९ चे वारस अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केला आहे.

०२. वादी यांचे अर्जातील कथन की, प्रतिवादी क्र. ९ यांचे वारस योग्य मुदतीत दाखल न केल्याने प्रतिवादी क्र. ९ विरुध्द दावा उपशमित झालेला आहे. वादीचे वारस दाखल करण्यास वादीना सुमारे १ वर्षे ९ महिना २४ दिवस एवढा विलंब झालेला आहे. परंतु, त्या कालावधीत संपुर्ण भारतदेशात कोवीड–१९ चा वाढता प्रादुर्भाव असल्याने सर्व ठिकाणी लॉक डाऊन केले होते. वादी हे वयस्कर इसम असून ते आजारी असल्याने त्यांना प्रतिवादी क्र. ९ चे वारस मुदतीत दाखल करता आले नाही. प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादी क्र. ९ विरुध्द उपशमित झाला. तरी सदरील आदेश रद्द बातल होवून अर्ज मंजुर करण्यात यावा अशी विनंती वादी तर्फे करण्यात आली आहे.

०३. प्रतिवादी यांनी सदर अर्जावरच आपले म्हणणे दाखल करुन सदरील अर्ज नामंजुर करावा अशी विनंती केली आहे.

०४. मुदतीचा कायदा आर्टीकल १२० नुसार दाव्यातील एखादा पक्षकार मयत झाल्यास मृत्युच्या तारखेपासून ९० दिवसांच्या आत मयत पक्षकाराच्या कायदेशीर प्रतिनिधींना दाव्यामध्ये समाविष्ट करुन घेणे आवश्यक असते. त्याचबरोबर अशा मयत पक्षकाराबाबत दावा उपशमित झाल्यास आर्टीकल १२१ नुसार ६० दिवसांच्या आत तो आदेश रद्द करुन घेणे आवश्यक आहे.

०५. प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी नं.०९ या दिनांक १७/०८/२०२० रोजी

मयत झाल्या आहेत. त्यामुळे मृत्यू तारखेपासून पुढे ९० दिवसांचे आत त्यांचे वारसाबाबत दाव्यामध्ये तजवीज करणे आवश्यक होते. परंतु प्रतिवादी नं.०९ यांचे वारस मुदतीत अभिलेखावर दाखल न केल्यामुळे प्रतिवादी नं.०९ विरुध्द दावा उपशमित झालेला आहे. प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादीविरुध्द सरस निरस धडे वाटप होऊन पृथक कब्जा मिळणेसाठी दाखल केलेला आहे. त्यामुळे परिणामकारक हुकूमनामा काढण्यासाठी प्रतिवादी नं.०९ विरुध्द झालेला दावा उपशमितचा आदेश रद्द करुन प्रतिवादी नं.०९ चे वारस दाव्यामध्ये सामील करणे आवश्यक आहे. परंतु वादी यांनी सदरचा अर्ज अतिशय विलंबाने म्हणजे ०१ वर्षे ०९ महीने २४ दिवस विलंबाने दिलेला होता. सदरचा विलंब हा नि. ३४ च्या आदेशान्वये माफ करण्यात आलेला आहे. प्रतिवादी नं.०९ चे वारसास रेकॉर्डवर आणण्यास झालेल्या विलंबामुळे प्रतिवादी व न्यायालयाचा वेळ खर्ची झाल्याने वादी यांचेवर योग्य तो खर्च लावणे आवश्यक आहे. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. नि.३५ कडील अर्ज वादी यांनी प्रतिवादीला रक्कम रुपये २००/– (रु.दोनशे मात्र) इतका खर्च देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी खर्चाची रक्कम दिल्यानंतर मयत प्रतिवादी नं.०९ विरुध्द दावा उपशमित झाल्याबाबत करण्यात आलेला आदेश रद्द करण्यात येत आहे.

३. येणेप्रमाणे अर्ज निकाली करण्यात येत आहे.

सही/–

दिनांक–२१/०२/२०२४

(प.रा.ढोरे )

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,

कुडाळ.